13 JAN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाला प्रात्यक्षिकाची जोड द्यावी

## विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचे मत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात पारदर्शकता कमी झालेली आहे. कौशल्यावर आधारित शिक्षण असावे, विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या उपक्रमात सहभाग घ्यावा. पुस्तकी ज्ञानाला प्रात्यक्षिकाची जोड हवी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

महाराष्ट्र हायस्कूल व ज्युनिअर कालेजचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेचे चेअरमन शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. इस्लामपूरचे प्रांत अधिकारी राजेंद्रकुमार जाधव यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपला आनंद ज्यात असेल त्यात प्रावीण्य मिळवले पाहिजे. कोणतीही गोष्ट करताना मनाची एकाग्रता ठेवा. स्पर्धेच्या युग असल्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील भरपूर वाचन करा. कलेला फार महत्त्व असल्याने आपल्या अंगी असलेल्या कला जोपसल्या पाहिजेत. इस्लामपूरचे प्रांत अधिकारी राजेंद्रकुमार जाधव म्हणाले, प्रत्येक विद्यार्थी हा हुशार असतो, शिक्षकांनी त्यांच्यातील गुण शोधून मार्गदर्शन केले पाहिजे.

प्राचार्य ए. एस रामाणे यांनी प्रास्तिविक केले. संस्थेचे आजीव सदस्य सी. एम. गायकवाड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपप्राचार्य यू. आर. आतकिरे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. ए. आर. भोसले, जिमखाना प्रमुख एस. ए. मोरे यांनी सुत्रसंचालन केले. पर्यवेक्षक उदय पाटील यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे संचालक ए. बी. पाटील, पी. के. पाटील, व्ही. एस. मोरे, पी. सी. पाटील, वाय. एल. खाडे, आजीव सेवक ए. डी. निकम, आर. डी. पाटील, माजी सेक्रेटरी एस. डी. राणे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.



**कोल्हापूर : महाराष्ट्र हायस्कूल व ज्युनिअर कालेजच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील, प्राचार्य ए. एस. रामाणे आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2018
लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठामध्ये 'बेटी बचाओ अभियान'

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये 'बेटी बचाओ अभियान' अंतर्गत पथनाट्याच्या माध्यमातून 'लेक वाचवा, माणूस वाचवा' संदेश देण्यात आला. 'बेटी बचाओ अभियान' या जनजागृती कार्यक्रमांतर्गत गारगोटी तहसील कार्यालय, पंचायत समिती व कर्मवीर हिरे महाविद्यालय या ठिकाणी समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याचे सादरीकरण केले. त्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून स्त्रीभ्रूणहत्येसारख्या गंभीर प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतानाच 'लेक वाचवा, माणूस वाचवा' असा संदेश दिला. हे पथनाट्य बेटी बचाओ अभियानच्या समन्वयक डॉ. प्रतिभा बी. देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. पथनाट्यात पूनम पाटील, सुहास रोमणे, आकाश पाटील, विक्रांत भोपळे, स्नेहल पट्टणशेटी, प्रीती रेडेकर, दीपाली राठोड, शुभांगी गुरव, लखन बेदरे, विद्या पिंपळे, दीप्ती खेडकर व शिल्पा कांबळे या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. पथनाट्याचे दिग्दर्शन अवधूत गायकवाड यांनी केले, तसेच महिला व बालविकास विभाग, गारगोटी यांचे विशेष सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# पथनाट्यातून 'लेक वाचवा'चा जागर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये बेटी बचाओ अभियान स्वतंत्ररित्या कार्यरत आहे. या अभियानचा भाग म्हणून विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी येथे पथनाट्याचे सादरीकरण केले.

या पथनाट्याच्या माध्यमातून लेक वाचवा, माणूस वाचवा असा संदेश दिला. अभियानच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांचया मार्गदर्शनांखाली पथनाट्याचे सादरीकरण झाले. पथनाट्यात पूनम पाटील, सुहास रोमणे, आकाश पाटील, विक्रांत भोपळे, स्नेहल पट्टणशेट्टी, प्रिती रेडेकर, दीपाली राठोड, शुभांगी गुरव, लखन बेदरे, विद्या पिंपळे, दीप्ती खेडकर व शिल्पा कांबळे या विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

13 JAN 2018 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Exam dept issues special instructions

## Asks Colleges To Gear Up For Semester Exams

File Photo



No extension will be granted if students fail to submit applications in time

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The exam department of Shivaji University, Kolhapur (SUK) on Thursday issued special instructions for colleges, universities and distance education departments for the upcoming semester examination (March 2018).

A circular, issued on January 11, by the exam department stated that during the exam few issues or errors can remain that can create chaotic situation if not rectified on time. Hence, to avoid it, the said instructions need to be followed by colleges, departments and distance education authorities.

"The exam forms should be submitted within the given deadline. Colleges and authorities concerned should ensure this. No extension will be granted if students fail to apply within the given deadline. It will be particular college or department's responsibility if their student fails to follow the deadline. For any kind of problem with the exam form, authorities should not send the parents or students to the exam department," the circular said.

It added that while filling the online form for the exam, many students fill in wrong information inadvertently that needs to be rectified initially by the college/department/distance education authorities. "If it can be achieved within due time, many chaotic changes could be avoided," the circular read.

One of the important instructions was that the exam department received many complaints regarding colleges refusing students to fill the examination form because they failed to pay the fees. "This is not acceptable and no institute shall engage in this kind of behaviour. No student shall be deprived of the exam," it added.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Times of India
13 JAN 2018

# SUK collects data for edu survey

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University in Kolhapur (SUK) has asked its affiliated colleges on January 11 to submit academic data of 2017-18 for the All India Survey on Higher Education (AISHE). The data submission, according to a circular passed by the university, has already started from the last week.

It further stated that the varsity will be conducting a workshop for nodal officers of AISHE in January. In case of discrepancies that arise during the enrolment, one can call on 0231-2609147. The AISHE is a program initiated by the HRD ministry of the Union government.

The AISHE contains information regarding an educational institute, infrastructure, income and expenditure. There is no restriction on courses and includes arts, science, agriculture, teacher education, management, engineering and medical.

The submitted data is used as indicators for educational development such as institution density, gross enrolment ratio, gender equality index, student-teacher ratio and per student expenditure. These information, according to the official, is useful in taking policy decisions and for research purposes.

जनसंपर्क कक्ष
13 JAN 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा. मोरे यांची विद्यापीठाच्या ओएसडीपदी नियुक्ती

प्रतिनिधी
वाकरे

शिवाजी विद्यापीठाचे माजी बीसीयूडीचे माजी संचालक आणि श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांची शिवाजी विद्यापीठाच्या ऑफीसर ऑन स्पेशल ड्युटी (ओएसडी) आणि अॅकॅडमीक अॅडवायझरपदी नियुक्ती झाली. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी नियुक्तीचे पत्र दिले.

प्राचार्य डॉ. मोरे गेली ४० वर्षे शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या नोकरीची सुरूवात श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयातून केली. याच महाविद्यालयात कार्यरत असताना माजी कृषी राज्यमंत्री स्व. श्रीपतराव बोंद्रे यांनी त्यांच्यावर १९९५ मध्ये प्राचार्यपदाची जबाबदारी सोपवली. या महाविद्यालयाला गुणवत्ता महाविद्यालय व व्यसनमुक्त महाविद्यालय बनविण्यात ते अग्रेसर होते. याच महाविद्यालयांच्या माध्यमातून त्यांनी शिवाजी युनिव्हर्सिटी सीनेट तसेच व्यवस्थापन परीषदेवर अनेक वर्षे काम केले. शिवाजी युनिव्हर्सिटी विकास आघाडी आणि प्राचार्य संघटनेच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रात भरीव काम त्यांनी केले. युनिव्हर्सिटी बरोबर राज्यातील अन्य विद्यापीठामध्ये विविध समितीवर काम केलें आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन शिवाजी युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी त्यांची अडीच वर्षांपूर्वी शिवाजी युनिव्हर्सिटीच्या बीसीयूडी संचालकपदी नियुक्ती केली. त्यांनी विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावरील सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी एक उत्कृष्ठ प्रशासक म्हणून नावलौकीक मिळवला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन युनिव्हर्सिटीने त्यांची ऑफीसर ऑफ स्पेशल ड्युटी या पदावर नियुक्ती केली आहे. त्यांच्या या निवडीचे शिक्षणक्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2018
तरुण भारत

# डॉ. कांबळे, डॉ. ओव्हाळ यांना 'डॉ. व्ही. एम. दांडेकर' पुरस्कार

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद यांच्या मार्फत उत्तम संशोधन शोधनिबंधासाठी दिला जाणारा मानाचा "डॉ. व्ही.एम. दांडेकर" 'पुरस्कार शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे व यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विशाल विष्णू ओव्हाळ यांना प्राप्त झाला आहे.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे अधिवेशन. "सहकार: काल, आज आणि उद्या" व "पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील





यांचे सहकारातील योगदान" या विषयावर पार पडले. क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल (ता. पुलूस) येथे परिषदेमध्ये प्रा. डॉ. पी. एस. कांबळे व डॉ. विशाल ओव्हाळ यांनी सादर केलेला "Vasantdada Patil: Inclusive Leadership in Maharashtra" हा शोधनिबंध सर्वोत्कृष्ट ठरला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2018
पुण्यनगरी

# 'ई-कंटेंट' कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, आय.क्यू.ए.सी. विभागाद्वारे ई-कंटेंट-डेव्हलपमेंट अँड होस्टिंग या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेस उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. अध्यक्षस्थानी डॉ. डी. टी. शिर्के होते. प्रस्तावना आय.क्यू.ए.सी. विभागाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी केले. कार्यशाळा समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. विषयतज्ज्ञ किशोर इंगळे, डॉ. श्वेता एस. मेथा यांनी विषयाचे सादरीकरण करून उपस्थितांचे शंका निरसन केले. डॉ. डी. बी सुतार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन अलमास पेंढारी यांनी केले. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी ग्रंथालयातील डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, एस. आर. बिर्जे, डॉ. आर. डी. खामकर व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
महाराष्ट्र टाईम्स
13 JAN 2018

# नवनेतृत्वासाठी प्रयत्न हवेत



सध्याची तरुणाई फार सजग बनत चालली आहे. समाजाला हवा असणारा बदल ती स्वत: घडवण्याचा प्रयत्न करत आहे. सोशल मीडियामुळे माहितीचा विस्फोट तरुणवर्गासाठी खुला झाला आहे. सोशल मीडिया हा तरुणांच्या हातातील हत्यार बनले आहे. त्याचा योग्य वापर केल्यास समाजामध्ये सकारात्मक बदल घडण्यास ही माध्यते साहाय्यभूत ठरतील. सोशल मीडियावरील चार ओळी एखाद्या वृत्तपत्राच्या अग्रलेखासारख्या असतात. त्यामुळे याचा जबाबदारीने वापर करणे गरजेचे आहे. राजकीय व सामाजिक जीवनात तरूणाईची उदासिनता वाढत आहे. राजकारण हा आपला पेशा नव्हेच, असा गैरसमज तरूणाईमध्ये निर्माण होतोय. तरूणांनी नेतृत्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. तरुणाईबद्दल समाजात विविध प्रकारची अयोग्य मते तयार होत आहेत. सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून वाटचाल करायला हवी. बेरोजगार तरूणांची संख्या वाढत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात युवकवर्ग व्यावसायिकतेकडे वळला आहे. अलिकडच्या काही वर्षांत युवक मोठ्या नोकऱ्या सोडून शेतीकडे येऊ लागले आहेत. नवीन तंत्रज्ञान वापरुन शेती किफायतशीर करीत आहे. त्यामुळे ही देशाच्या उज्वल भविष्याची नांदी आहे.

- प्रमोद पाटील,
बीजेसी, शिवाजी विद्यापीठ

13 JAN 2018 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



रविवारी साजरा होत असलेला मकरसंक्रांतीचा सण. स्नेहाचा गोडवा वाटणाऱ्या या सणाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ आणि शहरांतील कॉलेजांमध्ये ट्रॅडिशनल डेची धूम सुरू झाली आहे. शुक्रवारी साजऱ्या झालेल्या युवा दिनानिमित्त विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये असा माहौल दिसला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JAN 2018
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत ५ सुवर्ण, २ रौप्य आणि एका कांस्य अशा ८ पदकांची कमाई करून चंदीगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत स्थान मिळविणारे न्यू ज्युदो कराटे प्रशिक्षण केंद्राचे खेळाडू : सचिन पाटील, रणवीरसिंह भोसले, सिद्धार्थ साळोखे, शाहरुख मुल्लाणी, शंकर चौगुले (सर्व सुवर्णपदक विजेते), पार्थ पाटील व आझीम काझी (रौप्यपदक), अवधूत पाटील (कांस्यपदक). सोबत प्रशिक्षक शरद पोवार, अमित भोसले, लालासो गायकवाड.